**<u>ठळक बातम्या</u>**

- संविधान सभेत झालेल्या चर्चा, हा गौरवशाली वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मधून आवाहन

- जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत भाग घेण्यासाठी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री दावोसला रवाना

- राज्यातल्या सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर

- बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ल्या प्रकरणी मुख्य संशयिताला ५ दिवसांची पोलीस कोठडी

**आणि**

- बीड जिल्ह्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ आज सकाळी एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू

**<><><><><>**

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' कार्यक्रमातून केलं.

भारताच्या प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन, तसंच भारतीय संविधान लागू झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमीत्त डॉ. बाबासाहेब

आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवलं. येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन असल्याचं सांगून ते म्हणाले की, संविधानाने निवडणूक आयोगाला खूप महत्त्वाचं स्थान दिलं आहे, आणि गेल्या दशकभरात देशाची लोकशाही अधिक मजबूत आणि समृद्ध झाली आहे. निवडणूक आयोगानं तंत्रज्ञानाचा वापर करत, लोकशाहीला बळ दिलं आहे, असं म्हणत नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी त्यांनी श्रोत्यांना महिती दिली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं अंतराळात दोन उपग्रहांना परस्परांशी जोडण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करून दाखवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भारतीय अंतराळ तंत्रज्ञान स्टार्ट-अप कंपनीनं देशातला पहिला खाजगी उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती त्यांनी दिली. काही दिवसांपूर्वीच स्टार्टअप इंडिया योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. या काळात देशात निर्माण झालेले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स टियर २ आणि टियर ३ शहरांमधले आहेत,असं सांगून ते म्हणाले, यातून आपली स्टार्टअप संस्कृती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही हेच दिसून येतं. याबाबात त्यांनी वाशीमसह देशातल्या इतर काही शहरांचं उदाहरण दिलं. छोट्या शहरांमधले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स मुली चालवतात, असंही त्यांनी कौतुकानं सांगितलं.

## होल्ड - बाईट - मन की बात

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेला महाकुंभमेळा म्हणजे एकतेचं दर्शन घडवणारा महाकुंभ आहे, असं ते म्हणाले. यंदाच्या कुंभमेळ्यात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. देशाच्या विविध भागातले उत्सव- परंपरा आणि कुंभमेळा यांचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. हा कुंभमेळा डिजीटल माध्यमांतून जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरत असून त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे, असं ते म्हणाले. येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. देशात वन्यजीवांच्या संवर्धन आणि सहकार्यासाठी होत असलेल्या, तसंच महिला बचत गटांच्या प्रेरणादायी यशोगाथाही प्रधानंत्र्यांनी आजच्या 'मन की बात' मधून श्रोत्यांना ऐकवल्या.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, स्वित्झर्लंडमधल्या दाओस इथं उद्यापासून सुरु होणाऱ्या, जागतिक आर्थिक मंच २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते देशाच्या विकास आराखड्याची माहिती देतील. पाच दिवसांच्या जागतिक आर्थिक मंच कार्यक्रमात, समावेशक विकास तसंच सामाजिक, भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण या मुद्द्यांवर व्यापक चर्चा केली जाईल, असंही ते

म्हणाले. भारताचं आर्थिक धोरण, डिजिटल संरचना तसंच समाजाच्या सर्व घटकांना सक्षम बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर याबाबत जाणून घेण्यासाठी जग उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रात्री रवाना झाले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत त्यांच्यासोबत आहेत. डाटा केंद्रं, स्वयंचलित वाहनं, सेमीकंडक्टर, विद्युत वाहनं, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधं आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौर्यात केले जाणार आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व पालकमंत्र्यांची नावं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल जाहीर केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतःकडे गडचिरोली जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी ठेवली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे आणि मुंबई शहर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम पाहतील. मुंबई उपनगरच्या पालकमंत्रीपदी आशीष शेलार यांची नियुक्ती करण्यात आली असून चंद्रशेखर बावनकुळे यांना नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी दिली आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांना अहिल्यानगर, चंद्रकांत पाटील यांना सांगली, हसन मुश्रिफ यांना वाशिम, गणेश नाईक - पालघर, गिरीश महाजन - नाशिक, उदय सामंत - रत्नागिरी, पंकजा मुंडे - जालना, अदिती तटकरे - रायगड, नरहरी झिरवाळ - हिंगोली, पंकज भोयर - वर्धा, संजय

शिरसाट यांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त केलं आहे.

सह पालकमंत्री हे पद पहिल्यांदाच निर्माण करण्यात आलं असून गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून आशीष जयस्वाल आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री म्हणून मंगलप्रभात लोढा काम पाहतील.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली, त्यात १ हजार ४० अर्ज वैध ठरले आहेत, अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांसाठी एकूण १ हजार पाचशे २१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. उद्याच्या दिवसात अर्ज मागे घेता येणार आहेत.

**<><><><><>**

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली असून त्याला न्यायालयानं ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्याचं नाव मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद असं असून तो मूळचा बांग्लादेशी असल्याचा संशय आहे. त्याने आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याचं खरं नाव समोर आलं. प्राथमिक पुरावे आणि त्याच्याकडे आढळलेल्या काही गोष्टींवरून तो बांग्लादेशचा नागरिक असल्याची शक्यता दिसत असल्याची माहिती मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. हा

संशयित चोरीच्या उद्देशानं सैफ अली खानच्या घरात घुसल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी शहरात पोलिसांनी एका बांगलादेशी नागरिकाला अटक केली आहे. शांतिनगर पोलीस या बांगलादेशी नागरिकाची सखोल चौकशी करत आहेत.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडीच्या पिराणीपाडा परिसरात सुपर हॉटेलजवळ एक बांगलादेशी नागरिक गुप्तपणे राहात असल्याची माहिती शांतिनगर पोलीस ठाण्याच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार, काल रात्री छापा टाकून पोलिसांनी अबुल मोहम्मद अनवर हुसेन उर्फ बहादूर याला ताब्यात घेतलं. त्याच्याकडची सर्व कागदपत्रं बनावट असल्याचं आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ आज सकाळी एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू झाला. पोलिस भरतीसाठी धावण्याचा सराव करणाऱ्या या तिघांना बीडहून परभणीकडे जाणाऱ्या बसची धडक बसली. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीररीत्या जखमी झाला. हे तिघेही घोडका राजुरीचे रहिवासी होते. अपघातानंतर संतप्त जमावानं बस पेटवून दिली. पोलिसांनी बसचालकाला अटक केली आहे.

**<><><><><>**

खो खो विश्वचषक स्पर्धेत, भारतीय पुरुष संघानं काल नवी दिल्लीत दक्षिण आफ्रिकेला ६२विरुद्ध ४२ गुणांनी हरवून अंतिम फेरी गाठली. आता विजेतेपदासाठी त्यांचा सामना नेपाळसोबत होईल. तत्पूर्वी, भारतीय महिला संघानं विजयी घोडदौड सुरू ठेवत दक्षिण आफ्रिकेला ६६ विरुद्ध १६ अशा फरकानं पराभूत केलं. आता भारतीय महिला संघ देखील अंतिम फेरीत नेपाळसोबत लढणार आहे.

**//<><><><><>//**